# सूर्य (SURYA)

उमेदवाराचा आसन क्रमांक
Seat No. of the Candidate | 1200067 |

**महत्त्वाच्या सूचना (Important Instructions)**

1. सर्व प्रश्न (५०) सोडविणे आवश्यक असल्याने सर्व प्रश्न आधी वाचून त्यांतले काही सोडविण्यासाठी निवडायचे असे करण्यात वेळ दवडू नका. **कोणत्याही प्रश्नाला विकल्प उपलब्ध नाही. सर्व प्रश्नांना सारखेच गुण आहेत.**
   As all questions (50) are compulsory, do not waste time in reading all the questions first and then selecting some out of them to answer. **There is no option to any question. All questions carry equal marks.**
2. एकेक प्रश्न वाचा व त्याचे उत्तर लगेचच तुम्हाला दिलेल्या स्वतंत्र उत्तरपत्रिकेवर नोंदवा.
   Read the questions one by one and start recording your answer immediately on the separate answer-sheet provided.
3. दिलेल्या पर्यायांमधून सर्वाधिक योग्य/अचूक पर्यायाची उत्तर म्हणून निवड करा. त्यानंतर उत्तरपत्रिकेतील ज्या लंबवर्तुळात बरोबर उत्तराचे अक्षर लिहिलेले असेल ते लंबवर्तुळ **काळ्या/निळ्या** बॉलपॉइंट पेनने पूर्णपणे भरावा.
   उदाहरणार्थ, पाहा पुढे चार पर्याय लंबवर्तुळात दाखविले आहेत :
   Select the most appropriate/correct answer from the choices given. Then by using **Black/Blue ball point pen,** darken the oval completely bearing the alphabet of the appropriate/correct answer in the answer-sheet. See, there are four options in the ovals:

   (A) (B) (C) (D)

   समजा, बरोबर उत्तराच्या पर्यायाचे अक्षर C आहे तर C लिहिलेले लंबवर्तुळ काळ्या/निळ्या बॉलपॉइंट पेनने पूर्णपणे भरावे लागेल. कसे ते पाहा —
   Suppose the correct answer to a question is 'C' then darken the oval bearing 'C' as follows —

   (A) (B) ⬬ (D)

   दुसऱ्या कोणत्याही प्रकारे तुमचे उत्तर नोंदवू नका. Do not mark your answer in any other way.
4. एका उत्तरासाठी दोन किंवा अधिक लंबवर्तुळे भरू नका. **अशी उत्तरे स्वीकारली जाणार नाहीत.**
   Do not darken two or more ovals for your answer. In case you do so, they **will not be accepted.**
5. कोणत्याही परिस्थितीत एकदा नोंदवलेले उत्तर बदलू नका किंवा आधीचे उत्तर खोडू नका.
   In no case, you should change your answer or erase the earlier one.
6. ज्या क्रमांकाचा प्रश्न तुम्ही सोडवत आहात त्याच क्रमांकाच्या समोर उत्तरपत्रिकेत तुम्ही तुमचे उत्तर नोंदवत आहात याची खात्री करा.
   Make sure that you are marking your answer the same serial number which you are attempting.
7. जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर सुचत नसेल तर वेळ न घालवता पुढे जा. त्या प्रश्नाचा विचार नंतर करा.
   If you are not able to get answer to a question, leave it and proceed further. Do not spend time on it, you may try it later.
8. केवळ यादृच्छिक(रॅण्डम)रीत्या किंवा अंदाजापोटी उत्तरे देण्याचे निक्षून टाळा.
   Avoid marking answers at random or based on guesses.
9. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेतील शेवटचे पान क्र. १२ वापरावे.
   Use last page no. 12 of the question paper for rough work.
10. काही शंका असल्यास मराठी पेपरचा संदर्भ विचारात घ्या.
    Please refer to Original Marathi version of the paper, for clarification, in case of doubt.
11. पर्यवेक्षकाकडून स्पष्टीकरणासाठी मदतीची कोणतीही अपेक्षा करू नका.
    Do not expect any assistance from Class-room Invigilator/Supervisor for clarification.

1. वास्तववादाच्या मूलतत्त्वानुसार वास्तवाचे अस्तित्व ...... असते.
   A) भौतिक जगात
   B) समाजात
   C) मनात
   D) कल्पनेत

   According to basic principles of Realism, reality lies in the ............... .
   A) physical world
   B) society
   C) mind
   D) idea

2. आदर्शवादी निसर्गवादाचा पुरस्कार ............. यांनी केला.
   A) हर्बर्ट स्पेन्सर
   B) प्लेटो
   C) रॉस
   D) रूसो

   ............. propagated Idealistic Naturalism.
   A) Herbert Spencer
   B) Plato
   C) Ross
   D) Rousseau

3. कार्यवादाचा ............. यांनी पुरस्कार केला.
   A) रसेल
   B) ॲरिस्टॉटल
   C) जॉन ड्यूई
   D) रूसो

   ...................propagated Pragmatism.
   A) Russel
   B) Aristotle
   C) John Dewey
   D) Rousseau

4. महात्मा गांधीजींच्या मते शिक्षणाचे माध्यम ............. असावे.
   A) हिंदी
   B) मातृभाषा
   C) प्रादेशिक भाषा
   D) इंग्रजी

   According to Mahatma Gandhi, ................ should be the medium of education.
   A) Hindi
   B) Mother-tongue
   C) Regional language
   D) English

5. 'सत्य, शिव आणि सौंदर्य' ही शाश्वत मूल्ये आहेत असे ............. यांनी प्रतिपादन केले.
   A) रूसो
   B) प्लेटो
   C) जॉन ड्यूई
   D) रवीन्द्रनाथ टागोर

   ................ propagated 'Truth, Goodness and Beauty' as eternal values.
   A) Rousseau
   B) Plato
   C) John Dewey
   D) Ravindranath Tagore

6. ...................... हा आधुनिकीकरणाचा हेतू आहे.
   A) विज्ञान व तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर
   B) पर्यावरणीय समस्यांना अटकाव
   C) भांडवलशाहीला विरोध
   D) पैशाचा योग्य वापर

   ............... is the purpose of modernization.
   A) Appropriate use of science and technology
   B) Prevention of environmental problems
   C) Opposition to capitalism
   D) Sensible use of money

**7.** 'गॅट्स'नुसार शिक्षण म्हणजे .................... .

A) उपयुक्त वस्तू
B) सेवा
C) व्यवसाय
D) व्यापार

According to 'GATTS', education is a .................... .

A) commodity
B) service
C) profession
D) trade

**8.** श्रीप्रकाश समितीच्या शिफारशी ................. संबंधित होत्या.

A) स्त्री सबलीकरणाशी
B) सर्वसमावेशक शिक्षणाशी
C) जागतिकीकरणाशी
D) मूल्यशिक्षणाशी

Recommendations of Shriprakash Committee were related to ................. .

A) Women Empowerment
B) Inclusive Education
C) Globalization
D) Value Education

**9.** महिला स्वयंसेवी गटाचा मुख्य उद्देश .......... हा आहे.

A) सामाजिकीकरण
B) शिक्षण
C) सक्षमीकरण
D) आरोग्यनिगा

The main objective of women's self-help group is ....................

A) socialization.
B) education.
C) empowerment.
D) healthcare.

**10.** सर्वसमावेशक शाळेमध्ये ............ भर असतो.

A) सर्व विद्यार्थ्यांना समान वागणुकीवर
B) योजनांच्या काटेकोर अंमलबजावणीवर
C) सामाईक अध्ययन-अध्यापन कार्यनीतीवर
D) बालकांच्या गरजांप्रमाणे अध्ययन-अध्यापनाच्या लवचिकतेवर

Inclusive school emphasises ...............

A) equal treatment to all students.
B) strict implementation of the plans.
C) common teaching-learning strategies.
D) flexibility in teaching-learning as per students' needs.

**11.** पिआजे यांच्या मतानुसार स्वतःभोवतीच्या परिसरात .......... क्षमता म्हणजे बुद्धिमत्ता होय.

A) जगण्याची
B) काळजी घेण्याची
C) समायोजन करण्याची
D) परिवर्तनाची

Intelligence according to Piaget is the ability to ................ one's surrounding.

A) live-in
B) care for
C) adapt to
D) transform

**12.** ................ हे अंतर्मुख व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य नाही.

A) ताठरपणा
B) वस्तुनिष्ठता
C) लाजाळूपणा
D) सवयीची प्रतिक्रिया

.............. is not the characteristic of introvert personality.

A) Rigidity
B) Objectivity
C) Shyness
D) Habitual response

**13.** .............. ही अध्ययनाची दोन सूत्रे आहेत.

A) कठिणाकडून सोप्याकडे आणि अमूर्ताकडून कठिणाकडे
B) कठिणाकडून सोप्याकडे आणि अमूर्ताकडून मूर्ताकडे
C) सोप्याकडून कठिणाकडे आणि तर्काकडून मानसशास्त्राकडे
D) सोप्याकडून कठिणाकडे आणि मूर्ताकडून अमूर्ताकडे

Two maxims of learning are ................ .

A) Difficult to easy and abstract to complex
B) Difficult to easy and abstract to concrete
C) Easy to difficult and logical to psychological
D) Easy to difficult and concrete to abstract

14. ................ हे अनुभव अध्ययनाचे वैशिष्ट्य नाही.

A) आत्मप्रचिती
B) स्व-पुढाकार
C) स्व-मूल्यांकन
D) व्यापक परिणाम

.............. is not a characteristic of Experiential Learning.

A) Self-actualization
B) Self-initiative
C) Self-evaluation
D) Pervasive effect

15. शालेय विद्यार्थ्यांच्या वर्तनसमस्यांच्या कारणांचा शोध ............ केला जातो.

A) मुलाखतीद्वारे
B) व्यक्ती-अभ्यासाद्वारे
C) चाचणीद्वारे
D) निरीक्षणाद्वारे

............... is used to find out the causes of behavioural problems of a school child.

A) Interview
B) Case study
C) Test
D) Observation

**16.** सामाजिक मानसशास्त्रात ................ अभ्यास केला जातो.

A) समूह गतिशीलतेचा
B) व्यक्ती गतिशीलतेचा
C) व्यक्तिअंतर्गत समस्येचा
D) व्यक्तिविकासाचा

The study of ..................... is done in Social Psychology.

A) Group dynamics
B) Personal dynamics
C) Intra-personal problems
D) Individual development

**17.** ....................... हे संकल्पनाप्राप्ती प्रतिमानाचे जनक आहेत.

A) पिआजे
B) सचमन
C) ब्रूनर
D) ऑसुबेल

............... is exponent of the Concept Attainment Model.

A) Piaget
B) Suchman
C) Bruner
D) Ausubel

**18.** ..................... हा ज्ञानरचनावादी अध्ययनाचा एकात्मिक भाग आहे.

A) आकारिक मूल्यमापन
B) परीक्षेतील श्रेणीकरण
C) साकारिक मूल्यमापन
D) परीक्षापद्धती संपुष्टात आणणे

.................. is an integral part of Constructivist Learning.

A) Formative evaluation
B) Grading in examination
C) Summative evaluation
D) Abolition of examination system

**19.** .................. हा मार्गदर्शनाचा एकात्मिक घटक आहे.

A) मूल्यमापन करणे B) क्रमांकन करणे

C) परीक्षण करणे D) सल्ला देणे

............... is an integral factor of guidance.

A) Evaluating B) Ranking

C) Testing D) Advising

**20.** ................ हा पृच्छा प्रशिक्षण प्रतिमानाचा पोषक परिणाम आहे.

A) वैज्ञानिक अभिवृत्ती विकास

B) विविध दृष्टिकोनांसंबंधीच्या जाणीवजागृतीचा विकास

C) संशोधन दृष्टिकोनाचा विकास

D) वैज्ञानिक अभियोग्यतेचा विकास

..................... is the nurturing effect of Inquiry Training Model.

A) Development of scientific attitude

B) Development of awareness of various outlooks

C) Development of research attitude

D) Development of scientific aptitude

**21.** अध्ययनातील अडचणींच्या कारणांची निश्चिती करणे आणि उपचारात्मक कृतीसाठी आराखडा तयार करणे हे .............. मूल्यमापनाचे प्रमुख ध्येय आहे.

A) स्थाननिश्चिती B) आकारिक

C) नैदानिक D) साकारिक

The main aim of ........................ evaluation is to determine the causes of learning problems and to formulate a plan for remedial action.

A) placement B) formative

C) diagnostic D) summative

**22.** निबंधवजा उत्तराच्या गुणदानपद्धतीत सुधारणा करण्यासाठी .......................... .

A) हाती घेतलेल्या उत्तरपत्रिकेचे पूर्णपणे मूल्यमापन करावे.

B) सर्व प्रश्नप्रकारांसाठी एकच गुणदानपद्धती स्वीकारावी.

C) विद्यार्थ्याची पूर्वमाहिती विचारात घेऊन उत्तराचे मूल्यमापन करावे.

D) असंबद्ध घटकांच्या प्रभावावर नियंत्रण ठेवावे.

The Marking Scheme of essay type answers can be improved by ..................

A) evaluating the answer paper at a time.

B) adapting the same marking scheme to all types of questions.

C) evaluating answers by considering the previous record of students.

D) Controlling the influence of irrelevant factors.

23. ..................... यांचा अंतर्भाव करून आपल्याला दैनंदिन कृतींकडे पाहण्याच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून अनुकूल बदल करता येईल.

A) वार्षिक परीक्षा
B) सत्रान्त परीक्षा
C) प्रात्यक्षिक परीक्षा
D) अंतर्गत परीक्षा

We can change the attitude of students favourably towards the day-to-day activities by introducing ........

A) annual examination.
B) term-end examination.
C) practical examination.
D) internal examination.

24. विद्यार्थ्यांच्या संदर्भात शिक्षकाद्वारे निरीक्षण करण्यात आलेल्या अर्थपूर्ण घटना आणि घडलेल्या प्रसंगांचे वास्तव वर्णन म्हणजे ............. .

A) संख्यात्मक मापनश्रेणी
B) प्रासंगिक नोंदी
C) अभिवृत्ती मापनश्रेणी
D) वर्णनात्मक आलेखात्मक मापनश्रेणी

The factual description of meaningful incidents and events observed by a teacher about a student is known as ..................... .

A) Numerical rating scale.
B) Anecdotal records.
C) Attitude scale.
D) Descriptive graphic rating scale.

25. ...................... वापरण्यासाठी आणि त्याच्या अर्थनिर्वचनासाठी चिकित्सात्मक प्रशिक्षण आवश्यक आहे.

A) समाजमिती तंत्र
B) प्रक्षेपण तंत्र
C) निकष संदर्भ कसोटी
D) प्रमाणक संदर्भ कसोटी

...................... requires clinical training for administration and interpretation.

A) Sociometric technique
B) Projective technique
C) Criterion-referenced test
D) Norm-referenced test

26. डॉ. ब्लूम व त्यांचे सहकारी यांनी सर्वप्रथम .................. क्षेत्रात अंतर्भूत होणाऱ्या शैक्षणिक उद्दिष्टांची मालिका तयार केली.

A) बोधात्मक
B) भावात्मक
C) क्रियात्मक
D) सामाजिक

Dr. Bloom and his colleagues, first introduced the Taxonomy of Educational objectives in the .................. field.

A) cognitive
B) affective
C) psychomotor
D) social

27. एखाद्या वितरणात मध्यमान व मध्यांक माहीत असेल तर त्या वितरणाच्या बहुलकाची गणना ........... या सूत्राने करतात.

A) बहुलक = 2 (मध्यगा) - 3 (मध्यमान)
B) बहुलक = 3 (मध्यगा) - 2 (मध्यमान)
C) बहुलक = 2 (मध्यगा) + 3 (मध्यमान)
D) बहुलक = 3 (मध्यगा) +2 (मध्यमान)

In any distribution if we know the mean and median of the distribution then the mode can be calculated by the formula .......................

A) Mode = 2 (Median) – 3 (Mean)
B) Mode = 3 (Median) – 2 (Mean)
C) Mode = 2 (Median) + 3 (Mean)
D) Mode = 3 (Median) + 2 (Mean)

28\. .................. या केंद्रीय प्रवृत्तीच्या परिमाणासंदर्भात मध्यमानापासून घेतलेल्या सर्व प्राप्तांकांच्या विचलनाची बेरीज शून्य असते.

A) मध्यमान B) मध्यांक

C) बहुलक D) गृहीत मध्यमान

................ is a measure of central tendency in which the sum of all deviations taken from the mean is zero.

A) Mean B) Median

C) Mode D) Assumed Mean

29\. 9, 17, 16, 15, 18, 8, 7, 21, 29 या श्रेणीचा मध्यांक .................... आहे.

........................ is the median of a series of 9, 17, 16, 15, 18, 8, 7, 21, 29 .

A) 16 B) 18 C) 15 D) 21

30\. जर एखाद्या मालेतील प्रत्येक गुणामध्ये 5 मिळविले तर त्या मालेचे प्रमाणविचलन .............. .

A) 5ने वाढेल. B) बदलणार नाही.

C) 5ने कमी होईल. D) 5च्या पटीने वाढेल.

In a given series if each score is increased by 5, then the standard deviation of the series will ........... .

A) increase by 5. B) not change.

C) decrease by 5. D) increase by 5 times.

31\. भारताचे शैक्षणिक नियोजन हे देशाच्या .................... भाग आहे.

A) वार्षिक नियोजनाचा B) त्रैवार्षिक नियोजनाचा

C) पंचवार्षिक नियोजनाचा D) द्वैवार्षिक नियोजनाचा

In India, Educational Planning is a part of country's ................. .

A) yearly plan. B) 3-yearly plan.

C) 5-yearly plan. D) bi-yearly plan.

32\. .................... हा शालेय प्रशासनाचा मुख्य सूत्रधार असतो.

A) मुख्याध्यापक B) संस्थेचा अध्यक्ष

C) विद्यार्थी D) शिक्षक

.................... is the pivot of school administration.

A) Headmaster B) President of the management

C) Student D) Teacher

33\. राज्य सरकारला शिक्षणविषयक सल्ले देण्याचे कार्य .................. असते.

A) केंद्र सरकारचे B) राज्य शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे

C) शिक्षण संचालनालयाचे D) राज्य शिक्षण परिषदेचे

...................... gives advice related to education to the State Government.

A) Central Government

B) State Council of Education, Research and Training.

C) Directorate of Education

D) State Council of Education

34. 14 वर्ष वयोमर्यादिपर्यंत बालकांना नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षण दिले जावे ही कोठारी आयोगाची शिफारस ......... याला दुजोरा देते.

A) शिक्षणाद्वारे लोकशाही सुदृढ बनविणे
B) शिक्षणाद्वारे उत्पादनक्षमतेत वाढ करणे
C) शिक्षणाद्वारे अभिवृत्ती विकसित करणे
D) शिक्षणाद्वारे नैतिक मूल्ये रुजविणे

The Kothari Commission's recommendation of providing free and compulsory education to child till the age of 14 years, supports the policy of ...................... .

A) strengthening of democracy through education.
B) increasing productivity through education.
C) developing attitude through education.
D) inculcating moral values through education.

35. एनसीएफ-2005नुसार शिक्षकाची भूमिका ....................... आहे.

A) ज्ञानदात्याची
B) ज्ञानसंक्रमकाची
C) ज्ञाननिर्मात्याची
D) ज्ञानसंघटकाची

According to NCF-2005, teacher's role is of ............... .

A) knowledge giver.
B) knowledge transmitter.
C) knowledge generator.
D) knowledge organizer.

36. नवोदय विद्यालयांची स्थापना .................. या उद्देशाने करण्यात आली आहे.

A) ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे
B) आदिवासी भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे
C) शहरी भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे
D) सर्व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे

Navodaya Vidyalayas are established with the purpose of .................... .

A) providing quality education to talented children from rural area.
B) providing quality education to talented children from Adivasi areas.
C) providing quality education to talented children from urban area.
D) providing quality education to all talented children.

37. शैक्षणिक संस्थांची स्थापना आणि प्रशासन ही अल्पसंख्याकांच्या हक्काबाबतची तरतूद संविधानाच्या ........... कलमानुसार करण्यात आलेली आहे.

A) कलम - 30
B) कलम - 46
C) कलम - 28
D) कलम - 29

Right of Minorities to establish and administer educational institutions is provided in the constitution under...............

A) Article 30
B) Article 46
C) Article 28
D) Article 29

38. RTE-2009 च्या नुसार, ..................च्या परिसरात शालेय विद्यार्थ्यांचा प्रवेश शाळेत झाला पाहिजे.

A) 5 कि.मी.
B) 2 कि.मी.
C) 1 कि.मी.
D) 3 कि.मी.

According to RTE-2009, the students should get admitted in a school in the vicinity of ..................

A) 5 Km
B) 2 Km
C) 1 Km
D) 3 Km

**39.** ........................ हे शिक्षक संघटनेचे उद्दिष्ट नाही.

A) पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम संदर्भात शासनास सूचना करणे

B) शिक्षकांची नियुक्ती करणे

C) शिक्षकांच्या समस्येवर चर्चा करून त्या सोडविणे

D) शिक्षकांसाठी शैक्षणिक परिषदा व कार्यशाळांचे आयोजन करणे.

.............is not the objective of Teachers' Organizations.

A) To provide suggestions to government regarding text books and curriculum.

B) To appoint teachers.

C) To discuss and solve teachers' problem

D) To organize educational seminars, workshops for teachers.

**40.** ............... व्यवस्थापन समितीची जागा शाळा व्यवस्थापन समितीने घेतली आहे.

A) जिल्हा B) ग्राम C) पंचायत D) स्थानिक

............... Management Committee is replaced now by the School Management Committee.

A) Zilla B) Village C) Panchayat D) Local

**41.** विद्यार्थ्याला संशोधनाच्या सारांशाचे सादरीकरण करावयाचे असल्यास त्याला ................ चा वापर करावा लागेल.

A) एमएस-पॉवरपॉइंट B) एमएस-वर्ड

C) एमएस-प्रोजेक्ट D) एमएस-ॲक्सेस

To present a research synopsis, student will have to use .................... .

A) MS-Power Point. B) MS-Word.

C) MS-Project. D) MS-Access.

**42.** अध्ययन-अध्यापनासंदर्भात CAI म्हणजे .............. .

A) कम्प्युटर ॲडव्हाईज्ड इन्स्ट्रक्शन्स B) सेंट्रल असिस्टेड इन्स्ट्रक्शन्स

C) कम्प्युटर असिस्टेड इन्स्ट्रक्शन्स D) कम्प्युटर असाईन्ड इन्स्ट्रक्शन्स

In the context of teaching learning, CAI stands for.........

A) Computer advised Instructions B) Central assisted Instructions

C) Computer assisted Instructions. D) Computer assigned Instructions.

**43.** डी.व्ही.डी.चे पूर्ण रूप ................ हे आहे.

A) डायरेक्ट व्हिडिओ डिस्क B) डिजिटल व्हर्सटाईल डिस्क

C) डायरेक्ट व्हर्सटाईल डिस्क D) डिजिटल व्हिडिओ डिस्क

The full form of DVD is ......................

A) Direct video disc. B) Digital versatile disc.

C) Direct versatile disc. D) Digital video disc.

**44.** ...................... हे संगणकाचे अंतर्भरण (input) साधन आहे.

A) सीपीयू B) की-बोर्ड

C) प्रिंटर D) स्पीकर

......................is a input device for computer.

A) CPU B) Key-board

C) Printer D) Speaker

**45.** जेव्हा संप्रेषण आणि संगणक प्रणालीचे एकात्मिकीकरण झाले तेव्हा ............ ही नवीन शाखा उदयास आली.

A) माहिती-तंत्रज्ञान
B) माहिती संप्रेषण
C) संप्रेषण
D) सॅटेलाईट एज्युकेशन

When communication and computer technologies were integrated, the branch that emerged is called as ....................

A) Information Technology.
B) Information Communication.
C) Communication.
D) Satellite Education.

**46.** खाली दोन विधाने दिली आहेत :

1) शिक्षणक्षेत्राला अनेक बदलांचा अनुभव येतो आहे.
2) आपण अपारंपरिक अध्यापनमार्गांचा स्वीकार केला पाहिजे.

यांमध्ये .................... .

A) विधान 1 आणि 2 दोन्ही वस्तुस्थिती आहेत.
B) विधान 1 आणि 2 दोन्ही मते आहेत.
C) विधान 1 वस्तुस्थिती आहे आणि विधान 2 मत आहे.
D) विधान 1 मत आहे आणि विधान 2 वस्तुस्थिती आहे.

The following are 2 statements :

1. Field of education is experiencing many changes.
2. We must adopt non-conventional ways of teaching.

In this ............

A) Statement 1 & 2 are facts.
B) Statement 1 & 2 are opinions.
C) Statement 1 is fact and statement 2 is opinion.
D) Statement 1 is opinion and statement 2 is a fact.

**47.** एखादी घटना/प्रसंग यावर संशोधन करीत असताना पुढील क्रमाने पायऱ्यांचा अवलंब करावा लागतो ............. .

A) निरीक्षण-विश्लेषण-संश्लेषण-अर्थनिर्वचन
B) विश्लेषण-निरीक्षण-अर्थनिर्वचन-संश्लेषण
C) संश्लेषण-निरीक्षण-विश्लेषण-अर्थनिर्वचन
D) निरीक्षण-अर्थनिर्वचन-संश्लेषण-विश्लेषण

When researching an event/phenomena, the sequence of the steps are ...............

A) Observation-Analysis-Synthesis-Interpretation
B) Analysis-Observation-Interpretation-Synthesis.
C) Synthesis-Observation-Analysis-Interpretation
D) Observation-Interpretation-Synthesis-Analysis.

**48.** वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून काढलेले निष्कर्ष सार्वत्रिक स्वरूपाचे म्हणजेच .................. .

A) स्थल, काल व व्यक्तिनिरपेक्ष असतात.
B) स्थल, काल व व्यक्तिसापेक्ष असतात.
C) परिस्थिती व कालसापेक्ष असतात.
D) परिस्थिती व कालनिरपेक्ष असतात.

The conclusions drawn after carrying out a scientific study are universal in nature, as they are ..........

A) irrespective to space, time, person.
B) respective to space, time and person.
C) respective to the context and time.
D) irrespective to the context and time.

49. मोहिनी विज्ञान-शिक्षक म्हणून शाळेत कार्यरत आहे. तिच्या बऱ्याच विद्यार्थ्यांना सुबक आकृत्या काढण्यामध्ये अडचणी येतात असे तिच्या लक्षात आले. ही समस्या सोडविण्याचे तिने निश्चित केले आणि अवलंब करण्याच्या पायऱ्यांची यादी केली. तिने पहिली व तिसरी पायरी खालीलप्रमाणे लिहिली :

i) स्पष्ट आणि निःसंदिग्ध शब्दांत समस्येची मांडणी करणे.

iii) सुयोग्य उपायाची निवड करणे.

तिची दुसरी पायरी ................ ही असेल.

A) निष्कर्ष काढणे

B) निवडलेल्या उपायांची अंमलबजावणी करणे

C) समस्या सोडविण्यासाठीच्या विविध उपायांची यादी करणे

D) माहितीचे विश्लेषण करणे

Mohini is working as a science teacher in a school. She found that many of her students are facing difficulty in drawing neat diagrams. She decided to solve the problem and started enlisting steps to be followed. She listed first and third step as below :

i) Stating the problem in clear and unambiguous terms.

iii) Selection of appropriate solutions.

Her second step will be......................

A) drawing conclusions.

B) implementing the selected solution.

C) listing out the various solutions to the problems.

D) analyzing the data.

50. उच्च शिक्षणात संशोधनाला महत्त्वाचे स्थान आहे, कारण संशोधनामुळे ...................

A) ज्ञानवृद्धी होते.

B) जुन्या ज्ञानाचे नवीन अर्थबोध होतात.

C) जिज्ञासापूर्ती होते.

D) वरील सर्व गोष्टी साध्य होतात.

Research occupies an important place in the field of Higher Education, because ............

A) it leads to increase in knowledge.

B) it brings forth new interpretation to old knowledge.

C) it fulfils the quest for knowledge.

D) all above things are achieved.

---